**प्रेसनोट          दि.२५/१०/२०१७**

## <u>चोरी करणा-या गुन्हेगाराना अटक करुन त्याच्याकडुन गुन्हयातील गेला माल हस्तगत केलेबाबत</u>

डहाणु पोलीस ठाणे गु.र.नं ६६/२०१७ भादविसक ३७९,३४ प्रमाणे दि. १७/०५/२०१७ रोजी १२.५१ वा. दाखल आहे. सदर गुन्हयातील फिर्यादी प्रविण जगन बारी वय ४५ वर्षे, रा. तडीयाळे लोहार आळी, ता.डहाणु, जि.पालघर, यांने तक्रार दिली की दि.१६/०५/२०१७ रोजी १२.०० वा.चे सुमारास कैनाड नाका फुगा फॅक्टरी जवळ यातील फिर्यादी यंचे ओळखीचे आरोपीत १ व २ यांनी मोटरसायकलवर ठेवलेली फिर्यादीचे पत्नीची पैसे असलेली लेदर पर्स त्यामध्ये रुपये ५,०५,०००/-  रोख रक्कम फिर्यादीचे संमतीशिवाय लबाडीचे ईरादयाने स्वःताच्या फायदयाकरिता फिर्यादी व साक्षीदार यांना बोलण्यात गुंग ठेवुन उघडयावरुन चोरुन घेवुन गेले. त्याबाबत फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरुन वरील प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदरचा गुन्हा दाखल होवुन ५ महिन्याचा कालावधी होत असताना सदर गुन्हयातील आरोपीत यांचा गुप्त बातमीदारा मार्फत माहिती काढुन सदर गुन्हयातील ४ आरोपीत यांना अटक करण्यात आलेली आहे. सदर आरोपीत यांनी गुन्हयात चोरीस गेलेली रोख रक्कम ५,०५,०००/- रुपये आरोपीत यांच्याकडुन हस्तगत करण्यात आलेली आहे.

वरील कारवाई मा.श्री मंजुनाथ सिंगे पोलीस अधीक्षक साो पालघर, मा. श्री योगेश चव्हाण अपर पोलीस अधिक्षक साो पालघर, श्री सचिन पांडकर मा. उप विभागीय पोलीस अधिकारी साो डहाणु विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली श्री सुदाम शिंदे पोलीस निरीक्षक डहाणु पोलीस ठाणे तसेच पो.हवा १५८२ व्ही व्ही मर्दे, सहा फौज आवटे, पोना /३७९ राकेश पाटील,पोशि वरखंड डहाणु पोलीस ठाणे तसेच स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा बोईसर युनिटचे अधिकारी व कर्मचारी यांनी पार पाडली गुन्हयाचा पुढील तपास चालु आहे.